● रविवार, दि. १७ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १११ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## महागाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भाजपा सरकार सपशेल अपयशी

### राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांची टीका





**जालना । प्रतिनिधी -** राज्यात होऊ घातलेली निवडणुक ही दोन विचारांची लढाई आहे. या लढाईत धर्मनिरपेक्ष मतांचे विभाजन करण्यासाठी काही उमेदवार निवडणूक लढवत असून अशा लोकांपासून सावध राहून इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कैलास गोरंटयाल यांना मोठया मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री तथा काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी शुक्रवारी येथे आयोजित जाहीर सभेत बोलतांना केले.

जालना विधानसभा मतदार संघाचे इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांच्या प्रचारार्थ शहरातील गांधी चमन येथे शुक्रवारी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख हे होते. तर जालना लोकसभेचे पक्षाचे प्रभारी तथा माजी मंत्री डॉ.पी.सी. शर्मा, उमेदवार आ.कैलास गोरंटयाल, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र राख, युवा नेते अक्षय गोरंटयाल, विजय चौधरी,आपचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे, रिपाईचे जिल्हाध्यक्ष किशोर मघाडे, राकॉचे शहर जिल्हाध्यक्ष नंदकिशोर जांगडे,बदर चाऊस, शिवसेनेचे शहर जिल्हाध्यक्ष बाला परदेशी, महावीर ढक्का, अब्दुल रफीक, राजेंद्र जाधव आदींची व्यासपिठावर उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना पायलट म्हणाले की, केंद्रातील सत्ता आणि पैशांच्या जोरावर भाजपाने मागील अडीच वर्षापूर्वी फोडा फाडीचे राजकारण करून राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार पाडले होते. त्यामुळे महाराष्ट्रात होत असलेल्या या विधानसभा निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून आहे. केंद्रात दहा वर्ष भाजपा सत्तेत असून या सत्ता काळात शेतकरी, बेरोजगार यांचे प्रश्न सोडविण्यासाठीआणि महागाई कमी करण्यासाठी केंद्र सरकारने काय केले? शेतकऱ्यांचे दाम दुप्पट करण्याचे दिलेले आश्वासन दिले होते. त्याचे काय झाले असा सवाल उपस्थित करत पायलट यांनी केंद्रातील भाजपा सरकारवर सडकून टीका केली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे तो कटेंगे या केलेल्या वक्तव्याचा समाचार घेत अशी वक्तव्य करून तुम्हाला नेमकं काय साध्य करायचे आहे असा प्रश्न उपस्थित करत पडोगे तो आगे बढोगे हा काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा नारा आहे. मागील दहा वर्षापासून सत्तेत असणाऱ्या भाजपाने किती तरुणांना रोजगार दिला, शेतकऱ्यांच्या मालाला भाव काय दिला,महागाई कमी करण्यासाठी काय पाऊल उचलले ते पान २ वर

## कैलास गौड, गजानन तौर यांच्या खुनाचे गूढ उकल करणार - गोरंटयाल

**जालना । प्रतिनिधी -** शहरात गुंडागर्दी मोठया प्रमाणात वाढली असून शहरातील कैलास गौड, गजानन तौर आणि माजी नगरसेवक श्रीमती संगीता खिल्लारे यांच्या खुनाचे गूढ अद्याप उघड झाले नाही. मात्र, या खुनांचा छडा लावण्यासाठी आपण आगामी काळात निश्चितपणे प्रयत्न करणार असल्याचा स्पष्ट इशारा जालना विधानसभा मतदार संघाचे मविआचे उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी पत्रकारांशी संवाद साधतांना दिला बोलतांना दिला. जालना ही उद्योग नगरी असून या नगरीला नजर लावण्याचे काम आपले प्रतिस्पर्धी उमेदवार अर्जुन खोतकर यांनी केला असल्याचा उघड आरोप करत त्यांच्यामुळे शहरातील अनेक उद्योग बंद पडले असल्याचा आरोप गोरंटयाल यांनी यावेळी बोलतांना केला. शहरात चांगले उद्योग यावेत असा प्रयत्न आपण सातत्याने केला असून सेठ है तो सैफ है, और वो है तो थेट धमकी है असा नारा देत खोतकरांच्या कामाच्या पद्धतीवर टीका करून गोरंटयाल म्हणाले



की, मागील काळात कैलास गौड, गजानन तौर आणि माजी नगरसेविका श्रीमती संगीता खिल्लारे यांचे निर्दयीपणे खून करण्यात आले असून त्यांचे खून कसे झाले, कशामुळे झाले याबाबतचे गूढ आजपर्यंत कायम आहेत. मात्र आगामी काळात आपण या प्रकरणात जाणीवपूर्वक लक्ष देणार असून उपरोक्त खुनाचे गूढ उकलण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही देऊन मागील पाच वर्षात केलेली विकासाची कामे, पिण्याचे पाणी, शहरातील प्रभागाअंतर्गत तयार करण्यात आलेली सिमेंट रस्त्यांची कामे, आणि विद्यार्थ्यांना सर्वोतोपरी मदत करण्याचा प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही पत्रकारांशी संवाद साधतांना मविआचे अधिकृत उमेदवार आ.गोरंटयाल यांनी दिली.

युवा आदर्श

### पत्रकार ठाकरेजी ...

बाळासाहेब ठाकरे
सार्थ समर्थ पत्रकार
व्यंगचित्र हेचि शस्त्र
देई समाजा आकार
शब्दाला वेगळी धार
सणसणाणी तलवार
चूक जिथे घाव तिथे
मर्मावर करती वार
जे जे चांगले त्याचा
सदैव घेतला कैवार
मराठी कणा जपाया
तत्पर राही परिवार
वक्तृत्त्व अंबाई देणगी
शब्द जणू अलंकार
हव्यास नसे सत्तेचा
कोस लांब अहंकार
लिहण्या आधी काही
करी खोलात विचार
रेखाटता व्यंग चित्र
सत्तेसमोर न लाचार
सोडून गेले पदचिन्हे
कसे असावे पत्रकार
तुम्हासम दुजा नाही
झाले जरी चिक्कार
तेव्हा पाहिले स्वप्न
आत्ता होई साकार
छत्रपतींचे भक्त खरे
मुजरा तुम्हां त्रिवार

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## पडून असलेल्या वनिकरणाच्या झाडांसाठी शासनाचा पुढाकार; घनदाट प्रकल्प साकारणार

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील गेस्ट हाऊसमध्ये सहा महिन्यांपासून लागवडी विना पडून असलेली सहा हजार झाडे आता लावली जाणार आहेत. त्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाकडून प्रारंभ केला आहे. त्यामुळे आता टेंभुर्णी गेस्ट हाऊसमधील २० गुंठे जागेवर घनदाट प्रकल्प साकारणार आहे. याबाबत दैनिक युवा आदर्श ने वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची जिल्हा सामाजिक वनीकरण विभागाने दखल घेऊन वनरक्षकाची रिक्त जागा भरली असून, विजय राठोड यांना नियुक्त केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या कामाला सुरुवात झाली आहे.

एरवी गवत वाढलेले हे २० गुंठे क्षेत्र जेसीबीद्वारे स्वच्छ केले. शिवाय पडून असलेले ६ हजार रोपांना काढून टँकरद्वारे पाणी दिले जात आहे. सध्या या जागेवर झाडे लावण्यासाठी मोजमाप घेतले जात असून, येत्या पंधरा दिवसांत या ठिकाणी रोपांची लागवड केली जाणार आहे. 'दै. युवा आदर्श मधील वृत्तामुळे हा प्रकल्प कार्यान्वित होत असल्याने ग्रामस्थांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

जाफरबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील गेस्ट हाऊसमध्ये पडून असलेल्या सर्व सहा हजार रोपांची टँकरद्वारे पाणी देऊन काळजी घेतली जात आहे. घनदाट योजनेला वनीकरणाकडूनच खोडा, टेंभुर्णीत सहा हजार रोपे पडून सहा महिन्यांपासून रोपे जागेवर, गेस्ट हाऊसमधील पूर्वीच्या घनदाट प्रकल्पाकडेही दुर्लक्ष होत आहे. सध्या जेसीबीद्वारे वृक्ष लागवडीचे क्षेत्र स्वच्छ केले असून, लवकरच वृक्ष लागवडीला प्रारंभ केला जाणार आहे. यासाठी वनीकरण विभागाचे कर्मचारी मेहनत घेत आहे. यापूर्वी लावलेल्या घनदाट योजनेतील वृक्षांची ही विशेष काळजी घेतली जात असून, लवकरच मरळ ही भरली जाणार आहे. वृक्षांना नियमित पाणीपुरवठा व्हावा, म्हणून परिसरात घेतलेल्या बोरवेलमधून पाइपलाइन केली जाणार असल्याचे वनीकरणाच्या अधिकारयांनी सांगितले आहे.

## लाडक्या बहिणींना दिले अन् दाजीकडुन वसुल केले - अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** लोकसभा निवडणुकीत पराभवाचे तोंड पहावे लागल्यानंतर राज्यातील मिंदे सरकारने लाडकी बहीण सारखी योजना समोर आणून सरकारने आधार दिल्याचा दावा केला जात असला तरी दुसरीकडे गॅस सिलेंडर, खाद्य तेल आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढवून दाजींचा खिसा रिकामा करण्याचे काम राज्य सरकारने केले असल्याची टीका शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी येथे बोलतांना केली.

जालना विधानसभा मतदार संघाचे इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांच्या प्रचारार्थ शहरातील गांधी चमन येथे शुक्रवारी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.

भाजपा महायुतीवर टीका करतांना ते म्हणाले की, काही पक्षांनी घेऊ छत्रपतींचा आशीर्वाद आणि देऊ मोदींना साथ अशी फलकं राज्यभरात लावली मात्र, याच सत्ताधाऱ्यांच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याने पुतळ्याच्या कामात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट झाले असून आमच्यासह महाराष्ट्राच्या नव्हे तर देशातील शिवप्रेमींचा हा अवमान आहे. शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापसाला दहा वर्षापूर्वी असलेला भाव आज सत्ताधाऱ्यांनी पार तळाला नेऊन ठेवल्याने उत्पादक शेतकऱ्यांच्या चिंतेत मोठी भर पडली आहे.राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास लाडक्या बहिणींना प्रतिमहा ३ हजार रुपये देण्याचा वायदा मविआचे नेते खा.राहुल गांधी,राकॉ नेते शरदचंद्र पवार आणि शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी केला आहे. त्यामुळे मतदारांनी जागृत राहून जालन्यातील मविआचे उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून त्यांना भरघोस मतांनी विजयी करावे असे आवाहन शेवटी अंबेकर यांनी केले आहे.

## खोट्या विकासाच्या नावावर मते मागणाऱ्यांना चंदन लावा - जमील मौलाना

### दोघांचे शटर बंद, शटर बंद, शटर बंद - अब्दुल रशिद; सिर्फ चेहरे अलग है दोनो एकही हैं - शेख माजेद

खोट्या विकासाच्या नावावर मते मागणाऱ्यांना चंदन लावा - जमील मौलाना

दोघांचे शटर बंद, शटर बंद, शटर बंद - अब्दुल रशिद; सिर्फ चेहरे अलग है दोनो एकही हैं - शेख माजेद

अब्दुल हाफिज यांचे चंदनझिऱ्यात फटाक्यांच्या आतिषबाजीसह ढोल-ताशांच्या गजरात स्वागत

जालना । प्रतिनिधी - चंदनझिरा भागात मुस्लिम, दलित समाजासह इतर समाजासाठी स्मशानभुमील अद्याप जागा दिलेली नाही, येथे सरकारी दवाखाना नाही, महानगर पलिकेची शाळा नाही, पाणी १५ दिवसांनी येते, आणि आमदार म्हणताहेत विकास केला. अशा खोट्या विकासाच्या नावावर मतमे मागणाऱ्यांना आता चंदनझिऱ्यातील जनतेने चंदन लावण्याचे काम येत्या २० तारखेला अब्दुल हाफिज यांना मतदान करुन लावावे असे आवाहन जमील मौलाना यांनी येथे केले.

ते चंदनझिरा येथे शनिवार (दि १६) रोजी अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज यांच्या प्रचार सभेला संबोधित करत होते. यावेळी व्यासपीठावर मान्यवरांची उपस्थिती होती.

### अब्दुल हाफिज यांचे चंदनझिऱ्यात फटाक्यांच्या आतिषबाजीसह ढोल-ताशांच्या गजरात स्वागत

पुढे जमील मौलाना म्हणाले की, जालनेकरांना मुलभूत सोयीसुविधा देण्याचे काम आमदाराने केलेले नाही. त्यांच्यात घरात नगराध्यक्ष पद ही होते तरी देखील त्यांनी विकासाचे काम केले नाही. आलटून पालटून सत्तेत येणाऱ्यांनी दोन्ही नेत्यांनी केवळ लढवायचं भांडणे लावायचे काम केले. हिंदु-मुस्लीम एक सोबत आहेत, आमच्यात बटवारा होऊ शकत नाही. आमदार आणि नगराध्यक्षपद दोन्हीही त्यांच्याकडे असतांना मुस्लीम समाजाचे आशास्थान, समाजाची निशाणी हटविण्याचे काम त्यांनी केले. चारशे वर्षांपुर्वीची वेस त्यांनी रात्री एका धडकेत डॅमेज केली. नंतर प्रशासनाला हाताशी धरून त्यांनी ती दिवसाढवळ्या नेस्तनाभूत केली. हे केवळ तेथील कॉम्पलेक्स धारकांच्या फायद्यासाठी त्यांनी केले. काद्राबाद मधील झेंडा निशाण त्यांनी तेथून हटविले हे देखील त्यांनी तेथील एका दारूच्या दुकानासाठी केले. दारू दुकानासाठी अट होती की, जवळपास मंदीर, मस्जिद किंवा कुणा धर्म-जातीचे श्रद्धास्थान नको त्यासाठी त्यांनी तेथील झेंडा हटविला. झेंडा हटविल्यानंतर आठ दिवसांनी दारू दुकानाच्या उदघाटनाला ते गेले. या सर्वांचा बदला येत्या २० तारखेला घ्यायचा आहे. ८२ हजार मुस्लीम समाज असलेल्या घटकाला गेल्या ७० वर्षांत एकदाही आमदार बनविल्या गेले नाही. केवळ आमदारच नव्हे तर नगराध्यक्षही बनविले नाही. खासदार तर फार दुरचा विषय आहे. जालना शहरात मुस्लीम समुदायातील ९ जणांचे खून झाले. याचा योग्य तपास झाल्यास एक नंबरचे आरोपी कोण असतील असा प्रश्नही जमील मौलाना यांनी उपस्थित करत अब्दुल हाफिज यांना मतदान करण्याचे आवाहन केले.

**जो खुद के पैरो पे चल नहीं सकता वो हिफाजत करेंगा?**

म्हणे सेठ है तो सेफ है... जो खुद के पैरो पे ठिक से चल नहीं सकता वो क्या हिफाजत करेंगा असा टोला अब्दुल रशिद यांनी आ. कैलास गोरंट्याल यांचे नाव न घेता लगावला. या लोकांनी सगळ्या समाजाला वापरून घेतले आहे. फुटकचे जलसम्राट झाले आहेत. पाणी पुरवठ्याची योजना आणण्याचे काम भास्कर अंबेकर यांनी केले. त्याचे श्रेय हे आमदार घेताहेत. ज्याने काम केले त्याला श्रेय गेले पाहिजे, अब्दुल हाफिज यांना मुस्लिम समजून मतदान करू नका ते पान २ वर

# संपादकीय पान

## भूदान चळवळीचे प्रवर्तक

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची १५ नोव्हेंबर रोजी ४२ वी पुण्यतिथी होती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव



धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## गरिबीतून पुढे जाऊन डॉक्टर प्रदीप उखर्डे एमडी साठी निवड

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील सुभाष उखर्डे यांचे बंधू डॉक्टर प्रदीप उकर्डे यांनी गरिबी असताना सुद्धा शिक्षण घेऊन डॉक्टर की मिळवली. पुढे थांबले नाही. तर त्यांनी प्रयत्नातून पुढे जाऊन एमडी आयुर्वेद साठी प्रवेश मिळवला. त्यांनी नुकताच एमडी आयुर्वेद साठी अकोला येथील आयुर्वेद महाविद्यालयामध्ये निवड झाली आहे. त्यांच्या यशाबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. डॉक्टर वाघ,डॉक्टर आनंद भाले, विशाल देशमुख, नवनाथ शिंदे, डॉक्टर सुरोशे, डॉक्टर रमेश मोठे, डॉक्टर शिंदे, डॉक्टर समीर शेख, डॉक्टर कोरडे, डॉक्टर शेळके, डॉक्टर वराडे, आदर्श शिक्षक नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक शेख जमीर, नसीम शेख, उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख, संचालकविश्वनाथराव सांगोळे, प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राचे जाफराबाद तालुका अध्यक्ष शेख अशपाक, गणेश धनवाई, बीटी धनवाई, माजी उपसभापती दिनकर उखर्डे, समाधान दूनगहू, विजय काठोळे, संतोष आवटी, आदींनी अभिनंदन केले आहे.

## टेंभुर्णी पोलिसांची धडाकेबाज कारवाई, नाकाबंदी दरम्यान एक लाख रुपये जप्त

**टेंभुर्णी -** येथील टेंभुर्णी पोलिसांच्या पथकाने, जळगाव राजा टेंभुर्णी रोडवर, आचारसंहिता निमित्त भरारी पथक कार्यरत होते. या भरारी पथकाने तपासणी केली असता एका गाडीमध्ये एक लाख रुपये आढळून आले ते त्यांनी जप्त केले. सविस्तर वृत्त असे की विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आचारसंहिता चालू आहे. यादरम्यान टेंभुर्णी पोलिसांचे पथक राजुर फाटा येथे नाकाबंदी केली. यादरम्यान नाकाबंदी करत असताना वाहन चेकिंग करत असताना, विजय काशिराम डोंगरे राहणार देऊळगाव राजा हे आपल्या हुंदाई वेन्यू क्रमांक एम एच ०३ डक ४९४८ यामध्ये एक लाख रुपये घेऊन प्रवास करीत होते. नाकाबंदीमध्ये ते आढळले. नाका मधली पथकाने ते जप्त केले. आचारसंहिता निर्देशानुसार एफ एस टी पथकाकडे ही रक्कम वर्ग करण्यात आली आहे. व पुढील तपास करण्यात देण्यात आला आहे. कारवाई माननीय पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री आयुष् नोपाणी, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉक्टर गणपत दराडे, यांचे मार्गदर्शनाखाली टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे प्रभारी सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक देशमाने, पोलीस आमदार धनंजय जगदाळे, पोलीस कॉन्स्टेबल अशोक घोंगे, गजेंद्र भुतेकर, हरिभाऊ शिरसागर, होमगार्ड प्रकाश भुतेकर यांनी केली आहे.






पान १ व ४ वरुन

## सुरु केलेल्या योजना ...

असे सांगून ते म्हणाले की, जालना मतदारसंघाचा आमदार असताना मी रस्ते, पाणी पुरवठा, आरोग्य, रोजगार आणि वीज प्रत्येक गाव आणि शहरात आधुनिक सुविधा सुनिश्चित करण्यासाठी, प्रभावी योजनांची अंमलबजावणी केली. यामुळेच मला मतदारसंघातील जनतेचे प्रेम व आशीर्वाद लाभले ! भविष्यात जालना मतदारसंघास समृद्ध आणि संपन्न बनविण्यासाठी मी विकास आराखडा बनविला आहे! पाच वर्षात थांबलेल्या विकासाची पोकळी भरून काढायची व जालना मतदारसंघास पुन्हा एकदा विकासाच्या नव्या उंचीवर न्यायचे आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

श्री अर्जुन खोतकर व श्री अरविंद चव्हाण यांनी ठिकठिकाणी महापुरुषांच्या चरणी अभिवादन करून लोकांशी संवाद साधला. श्री. खोतकर यांचे ठिकठिकाणी डिजेच्या तालावर आणि फटाक्याची आतषबाजीत स्वागत करण्यात आले.

## महागाई बेरोजगारी ...

कधीच सांगत नाही. निवडणुक आली की, हिंदू - मुस्लिम असा वाद उकरून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे विकास, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कधीच बोलत नाहीत. आ. कैलास गोरंटयाल आणि या परिवाराने मागील अनेक वर्षांपासून जालनेकरांची सेवा केली आहे. पिण्याच्या पाण्याच्या मुख्य समस्येसह अन्य नागरी सुविधा असोत किंवा विकासाची कामे असोत गोरंटयाल यांनी नेहमीच जनतेसाठी राज्य सरकारशी संघर्षाची भूमिका घेऊन मतदार संघातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी लढा दिला आहे. राज्यात होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत परिवर्तन अटळ आहे.या निवडणुकीत जनतेच्या सेवेसाठी वाहून घेतलेले महाविकास आघाडीचे उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून त्यांना मोठया मताधिक्याने विजयी करा असे आवाहन करत राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आल्यास गोरंटयाल यांना मंत्रीपदाची संधी असून त्यासाठी आपण देखील पक्षश्रेष्ठींकडे शब्द टाकणार आहे. धर्मनिरपेक्ष मतांचे विभाजन करण्यासाठी आणि महायुतीला मदत होईल यासाठी काही उमेदवार अपक्ष निवडणूक लढवत असले तरी मतदारांनी त्यांची चाल ओळखून मतांचे विभाजन टाळण्यासाठी मविआचे उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना मोठया मताधिक्याने विजयी करा असे आवाहन शेवटी काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी केले आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे लोकसभा प्रभारी तथा माजी मंत्री डॉ. पी.सी.शर्मा यांनी देखील आपल्या भाषणातून उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांच्या मागील पाच वर्षातील कामांचे कौतुक करून जालना मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी गोरंटयाल यांना विजयी करण्याचे आवाहन शर्मा यांनी शेवटी केले. या सभेस इंडिया महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह परिसरातील जनसमुदाय मोठया संख्येने उपस्थित होता. संचलन राकॉचे पदाधिकारी राजेंद्र जाधव यांनी तर शेवटी सभेचे संयोजक महावीर ढक्का यांनी उपस्थितांचे आभार मानले. या सभेस जुना जालना भागातील महिला, पुरुष, युवक,युवती यांच्यासह परिसरातील जनसमुदाय मोठया संख्येने उपस्थित होता.

### मतदार कामाची पावती देतील - देशमुख

जालना शहर व मतदार संघात मागील काही दिवसांपासून मोठी गुंडागर्दी वाढली आहे. ही गुंडागर्दी संपुष्टात आणण्यासाठी मविआचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांना विजयी करा असे आवाहन जालना जिल्हा काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी येथे बोलतांना केले. ते म्हणाले की, मागील पाच वर्षात आ.कैलास गोरंटयाल यांनी मतदार संघातील पाणी प्रश्न, मेडिकल कॉलेज यासह अनेक महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने राज्य सरकारच्या विरोधात संघर्ष करत मतदार संघाचा विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. या कामाची पावती मतदार निश्चितपणे निवडणुकीत देणार आहेच. परंतु विजयी झाल्यानंतर त्यांची राज्याच्या मंत्रिमंडळात वर्णी लागावी अशी जनभावना असून याचा विचार करून त्यांचा राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश व्हावा यासाठी आपण स्वतः जातीने लक्ष घालावे असे साकडे काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी काँग्रेस पक्षाचे नेते तथा राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांना घातले.

## खोट्या विकासाच्या ...

सर्व समाजाचे आहेत. आलटून पालटून सत्तेत असणाऱ्या दोघांचेही येत्या वीस तारखेला शटर बंद, शटर बंद, शटर बंद करा असे आवाहन अब्दुल रशिद यांनी केले. प्रसंगी जनतेनेही शटर बंद, शटर बंद, शटर बंद म्हणत रशिद यांना प्रतिसाद दिला.

**रंगा-बिल्ला मधील संगीत खुर्चीचा खेळ संपवा**

संविधानाने मला आणि तुम्हाला बोलण्याचा अधिकार दिला आहे. जसे अब्दुल रशिद यांनी शटर बंद म्हटले आहे. बाजुला विरोधकांची सभा सुरु होती. अब्दुल हाफिज यांनी एन्ट्री होताच त्यांनी शटर बंद केले आहे. येत्या २३ तारखेला विजयाचा आनंद साजरा करायचा आहे. या रंगा-बिल्ला मध्ये गेल्या तीस वर्षांपासून संगीत खुर्चीचा खेळ सुरु आहे. हा खेळ आता संपवा असे आवाहन शेख माजेद यांनी केले. विरोधक म्हणताहेत अब्दुल हाफिज आताच आले. त्यांना मुर्ख आहेत. त्यांना माहिती नाही का? ते काँग्रेसचे दहा वर्षे शहराध्यक्ष होते, मराठा पत्रकार संघाचे ते १७ वर्षे अध्यक्ष राहिलेले आहे. त्यांना सर्व समाजातील लोकं मानतात. मागच्या एका निवडणुकीला रशीद पहेलवान यांची विधानसभा वारी हुकली होती. यंदा अब्दुल हाफिज यांना विधानसभेत पाठवायचे आहे. येत्या २० तारखेला दोन्ही चोरांना हाकलून लावा, ते तुम्हाला लालच देतील, त्यांच्या अमिशाला बळी पडू नका असे सांगतांनाच शेख माजेद यांनी लक्ष्मी दारात आलली तर तीला नाकारु नका म्हणत त्यांचे नोट घ्या आणि बटन १५ नंबरचे दाबा असे आवाहन केले. जुना जालना भागातील एक नगरसेवक आहे. अब्दुल हाफिज उमेदवारी मागतांना ज्याने धक्काबुक्की केली होती. त्या नगरसेवकाच्या बुथवर लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला १०२ मते मिळाली तर भाजपाला ४०० च्या मते मिळालेली आहेत. त्यामुळे तुम्ही एका चेहऱ्यातील दोघांनाही ओळखा त्यांचे केवळ चेहरे वेगळे आहेत दोघे एकच असल्याचेही शेख माजेद यांनी यावेळी सांगितले.

परिशिष्ट ४७

फॉरमॅट्स सी-१ ते सी-८ आणि सीए / सी-१ फॉरमॅट

**गुन्हेगारी प्रकरणांबद्दल घोषणा** (वृत्तपत्र, टिव्हीवर प्रकाशित करण्यासाठी उमेदवारासाठी)

(२०११च्या व्हीपी (सिव्हील) क्रमांक ५३६ (सार्वजनिक) इंटरेस्ट फाऊंडेशन आणि ओआरएस वि. भारतीय संघ आणि एएनआर.)

उमेदवाराचे नाव व पत्ता : **ॲड. भास्कर बन्सी मगरे, नंदनवन कॉलनी जालना.**

राजकीय पक्षाचे नाव : **अपक्ष**

निवडणुकीचे नाव : **विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४**

मतदार संघाचे नाव : **१००- घनसावंगी विधानसभा मतदारसंघ**

मी **ॲड. भास्कर बन्सी मगरे** (नावाच्या उमेदवार) वर नमुद केलेल्या निवडणुकीसाठी उमेदवार घोषित करा माझ्या गुन्हेगारी पुर्ववृत्तांबद्दल सार्वजनिक माहितीसाठी खालील तपशिल

**(अ) प्रलंबित फौजदारी खटले**

| क्र.नाही | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक आणि दिनांक | केसची स्थिती | विभाग (ले) संबंधित कायदे आणि गुन्ह्याचे संक्षिप्त वर्णन |
|---|---|---|---|---|
| **एससीसी/११४३/२०२१** | **प्रथम न्यायदंडाधिकारी-४ जालना** | **एससीसी/११४३/२०२१ दिनांक १९-०६-२०२१** | **प्रलंबित** | **आयपीसी ३४१, १४३, १४९** |
| **एससीसी/९९४/२०१९** | **प्रथम न्यायदंडाधिकारी-२ जालना** | **एससीसी/९९४/२०१९ दिनांक १५-०४-२०१९** | **प्रलंबित** | **आयपीसी १४३, १४९, ३४** |

**(ब) फौजदारी गुन्ह्यांसाठी दोषी ठरलेल्या प्रकरणांबद्दल तपशिल**

| क्र. नाही | न्यायालयाचे नाव व आदेशाची तारीख (तारिख) | कार्यालय(चे) आणि शिक्षेचे वर्णन लादलेले | कमाल शिक्षा लागू |
|---|---|---|---|
| **निरंक** | **निरंक** | **निरंक** | **निरंक** |
| **निरंक** | **निरंक** | **निरंक** | **निरंक** |

## भाजप नेते पाशा पटेल यांच्या अश्लील वक्तव्याविरोधात कर्जत जामखेड मध्ये महिलांचा एल्गार, पुतळा जाळून निषेध

**कर्जत-जामखेड । प्रतिनिधी -** भाजपाचे नेते पाशा पटेल यांनी भाजपाचे उमेदवार प्रा राम शिंदेंच्या प्रचारार्थ सभेत असभ्य व अश्लील भाषा आणि केलेल्या हातवारेच्या विरोधात कर्जत आणि जामखेड मधील महिला आक्रमक होत या वक्तव्याचा निषेध करीत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यासह जामखेड पोलीस चौकीसमोर कर्जत शहराच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात पाशा पटेल यांचा पुतळयास जोडे मारत जाळण्यात आला. यावेळी महायुती सरकार, माजी आमदार पाशा पटेल आणि उमेदवार प्रा राम शिंदे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.



जामखेड येथे भाजपा महायुतीचे उमेदवार प्रा राम शिंदे यांच्या प्रचारार्थ गुरुवारी संध्याकाळी भाजपाचे नेते माजी आमदार पाशा पटेल यांची सभा झाली. भर सभेत महिला-भगिनी समोर उपस्थित असताना पाशा पटेल यांनी अश्लील भाषा वापरली. तसेच सभेत अनेकदा अश्लील हातवारे केले. या कृत्याचा मतदारसंघातील महिलांनी शुक्रवारी दुपारी तीव्र भाषेत निषेध व्यक्त केला. यावेळी पाशा पटेलांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास महिला पदाधिकाऱ्यांनी जोडे मारत दहन केला. या प्रसंगी बोलताना राणी कानगुडे म्हणाल्या की, भर सभेत महिला-भगिनी उपस्थित असताना भाजपा उमेदवार राम शिंदेंच्या उपस्थितीमध्ये भाजपाचे नेते पाशा पटेल महिलांच्या बाबतीत अश्लील भाषा वापरत होते. अशा लोकांचा कडेलोट करायला हवा. जे अशी भाषा वापरत आहे त्यांना आई-बहीण आहेत की नाही ? असा प्रश्न पडतो. यावेळी कर्जत जामखेड मधील महिला भगिनी तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या कर्जत आणि जामखेडमध्ये पोलीस ठाण्यात जात पोलीस निरीक्षकांना पाशा पटेल यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.

## श्रीकृष्णनगर येथील तरुण कार्यकर्त्यांचा अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज यांना पाठिंबा



**जालना | प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार पत्रकार अब्दुल हाफिज यांना श्रीकृष्णनगर- जामवाडी येथील तरुण कार्यकर्त्यांनी पाठिंबा देऊन त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा संकल्प केला आहे.

माजी सरपंच सय्यद सलीम यांच्या नेतृत्वाखाली अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज यांच्या प्रचार कार्यालयात सर्व तरुण कार्यकर्त्यांनी उमेदवार अब्दुल हाफिज यांची भेट घेऊन त्यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी गावातून मोठे मताधिक्य देण्याचा देण्याचा त्यांनी संकल्प केला आहे. यावेळी शेख चांद, अमजद शेख, प्रवीण खरात, नईम शेख, सैयद फरहान, शाहरुख खान, शेख समीर, अखिल पठाण, मंसूर शाह, समद शेख, खलील सैयद, शेख समद, अमीन शेख, अरबाज सैयद, डॉ. अब्दुल वाजिद, शेख इमरान, सैयद तैयब आदींची यावेळी उपस्थित होती.

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रामध्ये आचारसंहिता कालावधीमध्ये पोलीसांची धडक कारवाई

# अवैध दारू विक्री, गुटखा विक्री, गांजा, नशेच्या गोळ्या, प्रोव्हीबिशन गुन्ह्यात कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी** - या परिक्षेत्रामध्ये २१ विधानसभा मतदारसंघ असुन विधानसभा निवडणुक अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ पासुन आचारसंहिता लागू झाल्यानंतर परिक्षेत्रातील सर्व जिल्हयामध्ये पोलीसांनी अवैध धंद्याविरुध्द विशेष मोहिम राबवुन गोपनिय माहिती वरुन ठिक-ठिकाणी छापा कारवाई करुन मोठ्या प्रमाणात अवैध दारु, गुटखा, अंमली पदार्थ **(NDPS)**, रोख रक्कम मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच अवैध अग्निशस्त्र / काडतुस, तलवार / चाकु बाळगणाऱ्या इसमांना कडुन मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आले आहे.

परिक्षेत्रामध्ये प्रत्येकी जिल्हयात रोडलगत हॉटेल, ढाबे, दारूविक्री करणाऱ्याचे राहत्या घराची झडती घेवुन, अवैध दारुची चोरटी वाहतुक करणारे, नदीकाठी देशी दारु आड्डे, गावटी हातभट्टी, ताडी तयार करणारे आड्डे उध्वस्त करुन विक्री करणाऱ्या इसमांवर एकुण जवळपास दिड हजार गुन्हे दाखल केले आहे व २ लाख ६५ हजार लिटर दारु जप्त करुन अंदाजे २ कोटी रु. किंमतीचा प्रोव्हीबिशन गुन्हयाचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

प्रत्येक जिल्हयात शाळा, कॉलेज, बाजारपेठ, किराणा दुकान, पानटपऱ्या व इतर संशयीत दुकानांची अचानकपणे झडती घेवुन प्रतिबंधीत गुटखा विक्री करणारे, गुटखाची ट्रक व इतर वाहनाद्वारे विक्रीसाठी चोरटी वाहतुक करणारे इसमांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येवुन ८४ गुन्हे दाखल केले आहे व साडेबारा हजार किलो गुटखा जप्त करुन २ कोटी रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

तसेच प्रत्येक जिल्हयात कापसाच्या शेतीच्या नावाखाली अवैध गांजाची लपवुन शेती करणारे, परराज्यातुन विक्रीसाठी गांजाची तस्करी वाहतुक करणारे, विना प्रिस्क्रिप्शन नशेच्या गोळ्या, औषध विक्री करणारे इसम व मेडीकल चालक मालक तसेच इतर अवैध अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमांवर ४२ गुन्हे दाखल केले असुन २८ क्विंटल अंमली पदार्थ जप्त करुन अंदाजे ३ कोटी रुपयांचा मुद्देमाल परिक्षेत्रामध्ये धडक कारवाई करुन जप्त करण्यात आलेला आहे.

परिक्षेत्रामध्ये विधानसभा निवडणुक २०२४ शांततेत व भयमुक्त होण्यासाठी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार, माहितगार गुन्हेगार, संशयीत गुन्हेगार, हिस्ट्रीशिट्र्स, पाहिजे फरारी आरोपी, छ्इथ आरोपी यांचा शोध घेणेकामी व त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणेकामी वेळोवेळी कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले होते. कोम्बींग ऑपरेशन दरम्यान व इतर मिळालेल्या गोपनिय माहितीद्वारे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार व संशयीत यांचा शोध घेवुन २० अवैध अग्निशस्त्र (गावटी कट्टा / पिस्टल) व १०४ नग अवैध तलवार / चाकु जप्त करुन परिक्षेत्रात आर्म ॲक्ट प्रमाणे ९७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर आरोपींनी परराज्यातुन अवैध अग्निशस्त्र प्राप्त केल्याची तपासात समोर आले आहे. तसेच परराज्यातुन अवैध तलवार / चाकु हे कुरियरच्या माध्यमातुन तस्करी करत असल्याचे तपासात समोर आले आहे व बऱ्याच दिवसांपासुन मिळुन न येणारे ४२९ पाहिजे (थरपींशव), ३० फरारी (लीलेपवशी) आरोपी यांचा शोध घेवुन पकडण्यात आले आहे. तसेच परिक्षेत्रामध्ये २,५०० नॉल बेलेबल वॉरंटची बजावणी करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुक २०२४ आदर्श आचारसंहितेचे अनुषंगाने नाकाबंदी वाहन चेकींग दरम्यान ५ कोटी रोख रक्कम व जवळपास १० कोटी रु. किंमतीचे सोने चांदी जप्त करुन कारवाई करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुक आचारसंहिता कालावधीमध्ये सभेमध्ये आक्षेपार्ह विधान करणारे, धरणे आंदोलन / मोर्चा / रॅली / उपोषणे, इत्यादी वर निबंध असतांना आदेशाचे उल्लंघन करणारे, शासकीय कामात अडथळा आणणे, सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोस्ट प्रसारीत करणे, मतदार यांना प्रलोभण देणे, विधानसभा निवडणुक कर्तव्यावर गैरहजर राहणे, मतदार यादीमध्ये नाव समावेश करण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर करणाऱ्या इसमांनावर परिक्षेत्रामध्ये एकूण ४३ गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

आचारसंहिता कालावधीमध्ये परिक्षेत्रात वाहतुक शाखेकडुन विशेष चेकींग मोहिम राबवुन मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या इसमांवर २३ हजार केसेस करुन २ कोटी दंड वसुल करण्यात आला आहे.

परिक्षेत्रातील धाराशिव जिल्हयाची हद्द कर्नाटक राज्य लगत ६४ कि.मी. सीमा आहे. सदर सीमेवर एकुण ४ ठिकाणी आंतर राज्य चेकपोस्ट लावण्यात आले आहेत. सदर चेकपोस्टवर आचारसंहिता लागु झाल्यापासुन आजपर्यंत साडेचार हजार लिटर अवैध दारु व दोन हजार कि. लो. प्रतिबंधीत गुटखा असा एकुण २५ लाख रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच ९ लाख रु किंमतीचा ३६ किलो अवैध अंमली पदार्थ साठा धडक कारवाई करुन जप्त करण्यात आलेला आहे.

विधानसभा आचारसंहिता कालावधीमध्ये आजपर्यंत रेकॉर्डवरील १२ गंभीर सराईत गुन्हेगारांवर कठोर **MPD** कायदाअंतर्गत कारवाई करुन त्यांना परिक्षेत्रातील विविध जेलमध्ये स्थानबंध करण्यात आले आहे. तसेच ८४ आरोपींना संबंधीत जिल्हयातुन तडीपार करण्यात आलेले आहेत. पुढील काही दिवसांत अधिकची कार्यवाही करण्यात येणार आहे.

वरील कारवाई ही मागील विधानसभा निवडणुक २०१९ व लोकसभा निवडणुक २०२४ पेक्षा मोठी आहे. विधानसभा निवडणुक बंदोबस्तकामी परिक्षेत्राकरीता **BSF, CRPF, RPF, SSB, SRPF, SPF** (केरला) कंपन्या मिळालेल्या असुन त्यांचे माध्यमातुन रुट मार्च आणी ंशिर ॐळपरींळेप चे कार्यक्रम आयोजित करुन ६५१ ठिकाणी रुट मार्च करण्यात आलेले आहे.

विधानसभा निवडणुक २०२४ शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडण्याकरीता, कोणतीही अप्रिय घटना घडु नये, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता परिक्षेत्रामध्ये बंदोबस्तकामी | विशेष पोलीस महानिरीक्षक, ४ पोलीस अधीक्षक, ५ अपर पोलीस अधीक्षक, ३० पोलीस उप अधीक्षक, ९९ पोलीस निरीक्षक, ५६८ सपोनि पोउपनि असे एकुण १३८२ पोलीस अधिकारी, ८५०० पोलीस अंमलदार व ६३५० होमागार्ड तसेच इडऋ-८, उठझऋ-५, ठझऋ-२, डडइ-२, डठझऋ-४, डझऋ केरला-४ असे एकुण २७ कंपनी असा मोठ्या प्रमाणात बंदोबस्त नेमण्यात आलेला आहेत.

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रात छ. संभाजीनगर ग्रा, जालना, बीड व धाराशिव असे एकुण ४ जिल्हे, ८८-पोलीस स्टेशन, ४३८९-गावे असुन २१ विधानसभा मतदार संघामध्ये ७७११ मतदान केंद्र, २१ काऊंटीग सेंटर व स्ट्रॉंग रुम आहे.

सदरची कारवाई ही वीरेन्द्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक बीड, श्री. अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक जालना, श्री. विनयकुमार राठोड पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण व श्री. संजय जाधव, पोलीस अधीक्षक, धाराशिव यांच्या नेतृत्वात जिल्हयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

# ६७६ जणांनी बजावला गृह मतदानाचा हक्क

**दत्ता देशमुख**
**जाफराबाद | प्रतिनिधी** - भोकरदन जाफराबाद विधानसभा मतदारसंघातील ८५ वर्षांवरील वयोवृद्ध व दिव्यांग व्यक्तींचे दोन दिवसांत निवडणूक आयोगाच्या पथकाने घरोघरी जाऊन मतदान करून घेतले. यामध्ये एकूण सातशे पाच मतदारांपैकी ६७६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या अनुषंगाने निवडणूक आयोगाने दिव्यांगांसाठी निवडणूक आयोगाच्या साइटवर माहिती अपलोड करणे किंवा संबंधित बीएलओकडे नोंदणी करणे गरजेचे होते. ज्या दिव्यांगांनी नोंदणी केली त्यांना मतदानाचा हक्क घरच्या घरी बजावता आला.

निवडणूक आयोगाच्या वतीने वयोवृद्धांना व दिव्यांग व्यक्तींना मतदानासाठी मतदान केंद्रात न येता त्यांच्या घरी जाऊन मतदान करून घेण्याची प्रक्रिया राबविण्यात आला.

तालुक्यांमध्ये मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी ३३४ बीएलओमार्फत मतदार नोंदणी जागरूकता करण्यात आली होती. याच बीएलओच्या मार्फत दिव्यांग आणि वयोवृद्धाची नोंदणी करून त्यांच्या माध्यमातून दोन दिवस निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी गृहमतदान करून घेतले. जाफराबाद तालुक्यात दीडशे बीएलओ गावोगावी कार्यरत असून गृहमतदानासह त्यांच्याकडून घरोघरी निवडणूक आयोगाच्या पोल चिट वाटण्याचे कामही सुरू आहे. दरम्यान, ज्या दिव्यांगांनी आपली माहिती निवडणूक आयोगाच्या साइटवर अपलोड केले नाही किंवा संबंधित बीएलओशी संपर्क केला नाही, अशा दिव्यांगांना मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रात मतदान करावे लागणार आहे.

दरम्यान, मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान करावे. असे आवाहन सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी सारिका भगत यांनी केले आहे.

# निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात; सतीश घाटगेंना समर्थनासाठी रात्रभर वेटींग

## अधिकृत पक्षाच्या उमेदवारांपेक्षा घनसावंगीत अपक्ष घाटगेंची चलती!





**घनसावंगी | प्रतिनिधी -** विधानसभा निवडणूक २०२४ च्या प्रचा अंतिम टप्प्यात आला असून अवघे दोन दिवस प्रचाराला शिल्लक राहिलेले आहे. घनसावंगी मतदार संघातील निवडणुन या वेळी ऐतिहासिक होणार असल्याचा अंदाज पुर्वीपासूनच व्यक्त केला जात होता. अशातच येथील अपक्ष उमेदवार सतीश घाटगे यांच्या लोकप्रियतेत दिवसेंदिवस वाढ होत चालली असून अधिकृत पक्षाच्या उमेदवारांपेक्षा त्यांचीच या ठिकाणी चलती असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. सतीश घाटगे यांना पाठींबा- समर्थन देण्यासाठी रात्रभर नागरिक, कार्यकर्ते हे वेटींगवर आहेत. २४- २४ तास जनतेच्या रांगा त्यांच्या निवासस्थानी, सभेच्या ठिकाणी व कार्यालयावरुन दिसत आहे.

घनसावंगी विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदा राजकीय पक्षांच्या उमेदवारांना जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठी धडपड करावी लागत असल्याचे चित्र आहे. कारण आत्तापर्यंत घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न आणि समस्यावर कोणीही परखडपणे बोललं नाही. तसेच या समस्या कायमस्वरूपी सुटण्यासाठी विकासाचे शाश्वत व्हीजन कुणीही मांडले नाही. या निवडणुकीत सतीश घाटगे यांनी घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील प्रमुख समस्या आणि भविष्यातील आव्हाने यावर आधारित आपले विकासाचे व्हिजन जनतेसमोर अतिशय स्पष्टपणे मांडले. तसेच हे व्हीजन सत्यात कसे उतरवणार आहे, याची ब्ल्यू प्रिंट देखील जनतेसमोर मांडली आहे. सतीश घाटगे यांचा विकासाचा अजेंडा जनतेमध्ये लोकप्रिय ठरला असून घनसावंगीच्या विकासासाठी परिवर्तन गरजेचे आहे, असा निर्धार जनता करत असल्याचे दिसत आहे. सतीश घाटगे यांना पाठिंबा देण्यासाठी प्रत्येक जालना, अंबड आणि घनसावंगी तालुक्यातून गावागावातील जनता पाठिंबा देण्यासाठी मोठ्या संख्येने येत आहेत.

घनसावंगी तालुक्यातील रामसगाव , शेवता, बानेगाव , भोगगाव या गावांच्या दौऱ्यात सतीश घाटगे यांना जनतेचा मोठा पाठींबा मिळाला. या ठिकाणी झालेल्या कॉर्नर सभेस गावकरी मोठ्या संख्येने जमले होते. गावकऱ्यांनी एकमुखाने सतीश घाटगे यांना साथ देण्याचा विश्वास दिला.

## लहूजींचे क्रांतिकारी विचार अंगिकारुन समाज परिवर्तन शक्य - सपोनी सचिन खामगळ




**टेंभुर्णी | प्रतिनिधी -** साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे नगर टेंभुर्णी येथे समाज बांधवांच्यावतीने आद्य क्रांतिगुरु लहूजी वस्ताद साळवे यांच्या २३० व्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांच्या हस्ते महामानव क्रांतिगुरु लहूजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी समाज बांधवांना मार्गदर्शन करतांना सचिन खामगळ यांनी लहूजी वस्ताद साळवे यांच्या क्रांतीकारी जीवनावर प्रकाश टाकला.बोलत असतांना भारतीय स्वातंत्र्याच्या सशस्त्र क्रांतीचे जनक लहूजी वस्ताद साळवे यांच्या क्रांतीकारी विचारच समाज परिवर्तनासाठी गरजेचे आहे तसेच आपण त्यांच्या शैक्षणिक क्रांतीचा विचार करुन शिक्षणाची कास धरावी व समाज एकसंघ करुन सामाजिक परिवर्तन साधावे असा संदेश त्यांनी दिला.

तसेच येणाऱ्या निवडणुकीत सर्वांनी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून १००% मतदानाचा हक्क बजवावा.


याप्रसंगी संजय गांधी निराधार समिती सदस्य किशोर भाऊ कांबळे,प्रा मधुकर गोफणे सर,माजी ग्रा पं सदस्य सिताराम गोफणे,उत्तमराव गोफणे, प्रा राजू गोफणे सर साहेबराव गोफणे,भास्कर गोफणे,शेनफड गोफणे,आसाराम गोफणे,मधुकर गोफणे,राम राव गोफणे,पुंजाराम गोफणे रंगनाथ म्हस्के ,गणेश गोफणे भगवान गोफणे आर्मी संजय गोफणे अरुण गोफणे अशोक गोफणे शांताराम गोफणे,विजय गोफणे,रमेश गोफणे,सचिन गोफणे,राजू गोफणे,आकाश म्हस्के,शिवाजी ससाणे,मंगेश गोफणे,शिवाजी गोफणे प्रदीप संगट रवी गोफणे राज कांबळे तसेच महिला व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजू गोफणे सर यांनी केले.

# पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या सामाजिक उपक्रमांतर्गत शाळांचे डिजिटल सक्षमीकरण ११ शाळांना १०० संगणक संच वाटप

**बोरघर | माणगाव | प्रतिनिधी** - पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील ११ शाळांना एकूण १०० संगणक संचांचे वाटप केले आहे. यामध्ये १००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे. या डिजिटल युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कंपनीने हा अत्यंत प्रेरणादायी उपक्रम राबवला आहे.

उदघाटन समारंभ माणगांव येथील एस.एस. निकम इंग्लिश स्कूल या शाळेत आयोजित केला गेला, या कार्यक्रमात कंपनीचे उपव्यवस्थापकीय संचालक श्री.इन क्यो बे, संचालक श्री. सिओंग डेओक कांग, प्रशासन विभाग प्रमुख श्री. महेंद्र तट्टे, शाळा संस्थापक डॉ. निकम, प्रा. संगीता कोकाटे तसेच इतर शिक्षकगण व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना संगणकाचे महत्त्व, त्याचे शैक्षणिक उपयोजन आणि भविष्यातील करियरच्या संधींविषयी मार्गदर्शन देण्यात आले. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत संगणकावर वेगवेगळ्या (मायक्रोसॉफ्ट वर्ड, पॉवर पॉइंट, एक्सेल) टूलमध्ये आपले नाव कसं लिहायचं, अक्षरांचे फॉरमेटिंग, वेगवेगळे आकार कसे काढायचे या गोष्टी शिकवल्या. यामुळे विद्यार्थ्यांच्या डोळ्यांमध्ये उमटलेला आनंद आणि नवीन संधींची चमक पाहून, या उपक्रमाच्या यशस्वितेची झलक मिळाली. या प्रसंगी बोलताना श्री. इन क्यो बे म्हणाले, आधुनिक काळात डिजिटल शिक्षण महत्त्वाचे आहे. शाळांमध्ये संगणक उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल जगाची जवळून ओळख करण्याची संधी मिळणार आहे. शालेय शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी हा उपक्रम अत्यंत मोलाचा ठरेल. पोस्को महाराष्ट्र स्टीलला आपल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाला हातभार लावण्याचा अभिमान आहे.





हा उपक्रम शिरवली, कडापे, कांदळगाव, भाले, निजामपूर, साई, उतेखोलवाडी, माणगांव, पाटणूस, विळे या गावांतील शाळांमध्ये राबवण्यात आला. या उपक्रमाला स्थानिक समुदायाकडून भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. शाळांमधून संगणकांच्या उपयोगाने विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक ज्ञानाची रुची वाढणार आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता होती, असे शिक्षणतज्ञांनी नमूद केले. या संगणकाच्या मदतीने विद्यार्थ्यांना विविध विषयांतील ज्ञानाची गोडी लागेल आणि भविष्यातील तंत्रसाक्षर नागरिक बनण्यासाठी त्यांना महत्त्वाचे सहकार्य मिळेल.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणात बदल घडवून आणण्यासाठी पोस्को महाराष्ट्र स्टीलने घेतलेला पुढाकार हे ग्रामीण भागातील शाळांसाठी एक नवचैतन्य आहे. समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पोस्को महाराष्ट्र स्टील नेहमीच तत्पर आहे.

# सुरु केलेल्या योजना बंद पडू नये म्हणून महायुतीच्याच उमेदवाराला विजयी करा-खोतकर

**जालना । प्रतिनिधी** - महायुतीच्या सरकारने सुरु केलेल्या विविध योजना बंद पडू नये म्हणून महायुतीच्या उमेदवारालाच विजयी करा, असे आवाहन महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार श्री. अर्जुनराव खोतकर यांनी विविध ठिकाणी बोलतांना केले.

ते मतदार संघातील सावरगांव, हडप,बाजी उम्रद तांडा, सोमनाथ जळगाव, बाजी उम्रद, ब्राम्हणखेडा आदी ठिकाणी झालेल्या कॉर्नर बैठका, सभेत ते बोलत होते. यावेळी माजी आ. अरविंदराव चव्हाण, शैलेश घुमारे, कयुम हाजी बेग, संजय शेजुळ, युवा सेना, शिवसेना, महिला आघाडी तसेच महायुतीच्या पदाधिकार्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


याप्रसंगी पुढे बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की, महायुती सरकारने सुरु केलेल्या योजना बंद पडण्याची भिती आहे. एक रुपयात पिक विमा, पिकविमा व अतिवृष्टी चे अनुदान, शेतकर्यांना मागेल त्याला सौर पंप, महिलांना बसमध्ये ५० टक्के सवलत, मुलींना मोफत शिक्षण, युवकांना रोजगार, वृध्दांना मोफत बस, वयोश्री व तिर्थक्षेत्र योजना यासारख्या अनेक कल्याणकारी योजना सुरू करून त्या प्रत्यक्षात अंमलात आणल्या. या योजनांचा सर्व समाजातील गोरगरीब व कष्टकरी वर्गाला न्याय देण्याचे काम महायुती सरकारने केले आहे. आपण जर का चुकीचा आमदार निवडला तर तो आपल्या गावचेही वाटोळे करु शकतो, हे आपल्याला लक्षात ठेवावे लागेल. महायुती सरकारने केवळ एक रुपया पिकविमा योजना सुरु केली, एस.टी.ने मोफत प्रवास दिला, वीज बील माफ केले, लाडकी बहिण योजना सुरु केली. अशा किती योजना आहेत, ज्या महायुती सरकारने सुरु केल्या आहेत. आणि विरोध काय करतात तर महायुतीच्या जाहीर नाम्याची कॉपी करतात,

**पान २ वर**





येत्या वीस तारखेला धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटन दाबून मला प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन महायुतीचे उमेदवार अर्जुन खोतकर यांनी केले. तुमचे कुठलेही काम करण्यास मी सज्ज आहे. सत्तेवर असो वा नसो तरीही मी मोठ्याप्रमाणात निधी आणून या शहरातील कामे केली आहेत. आज जे कुणी माझ्या नावाने बोटे मोडीत असतील परंतू सत्य हे लपून राहत नाही. नगर पालिका कोणी खाल्ली, हे सर्वांना माहितच आहेत. शहराला थेट जायकवाडीतून पाणी कोणी आणले, मेडीकल कॉलेज कुणी आणले, हेही जनतेला माहित आहे, असे असतांनाही तो भामटा म्हणतो की, माझ्यामुळेच हे सर्व आले आहे, असे सांगून ते म्हणाले की, शहरी भागातील महिला, नागरीक आणि युवा पिढीसाठी विद्यमान सरकारने फार मोठ्या प्रमाणावर योजना राबवल्या आहेत. आखल्या आहेत, भविष्यात या योजना बंद होऊ नयेत, याची खबरदारी ही मतदार म्हणून आपल्याला घ्यायची आहे. जालना महानगर पालिकेच्या निवडणूका आता लवकरच होणार आहेत, महापालिकेचा कारभार आपल्याला सुधारावा लागणार आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.